# आता हमालही बोलणार

# Good morning ! Welcome to Pune, May I help you…???

## सुर्यदत्ता इन्स्टिटयूट चा अनोखा उपक्रम

पुणे : पुणे रेल्वेस्थानक लवकरच आंतरराष्ट्रीय दर्जाचे रेल्वे स्थानक होणार आहे आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांबरोबरच ग्राहकांशी होणारा हमालांचा संवादही आता इंग्रजीमध्ये होणार आहे.

होय हे शक्य आहे! सुर्यदत्ता इन्स्टिटयूटच्या वतीने पुणे रेल्वेस्थानकावरील हमालांसाठी प्राथमिक इंग्रजी शिक्षणाच्या अनोख्या उपक्रमाला सुरुवात झाली आहे.

सुर्यदत्ता इन्स्टिटयूट चे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया व सौ. सुषमा चोरडिया यांच्या संकल्पनेतुन साकारलेल्या या उपक्रमाला आज विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात सुरुवात झाली.

या प्रसंगी पुणे रेल्वे स्थानकाचे डेप्युटी मॅनेजर श्री. बी. व्ही. पाटील, मॅनेजर श्री. सुमीत कामथने, नगरसेवक श्री. रविंद्र माळवदकर, हरिद्वार येथील पतंजली आश्रमाचे श्री. खंडेलवाल, प्रा. एम. सी. सेठीया, प्रा. श्रीमती शिला ओक व पुणे रेल्वे स्थानकातील अनेक हमाल विद्यार्थी उपस्थित होते.

समाजातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी “शिक्षण सर्वांकरिता” (Education for All) ही संकल्पना घेऊन सुर्यदत्ता इन्स्टिटयूट गेली १० ते १२ वर्षे काम करित आहे, या पूर्वी रिक्षा चालक, कागद गोळा करणारे कर्मचारी बंधू-भगिनींना संस्थेच्या वतीने प्राथमिक शिक्षण व इंग्रजीचे ज्ञान देण्याचा उपक्रम राबविला आहे.

आजच्या आधुनिक युगात प्राथमिक शिक्षण खूप आवश्यक आहे. म्हणून २ महिन्यांच्या आधुनिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्थेच्या प्रा. श्रीमती शिला ओक यांनी पुणे रेल्वेस्थानकावर आज हमालांचा इंग्रजीचा तास घेतला.

गुड मॉर्निंग, माय नेम इज ……, माय बॅच नं. इज ….., वेलकम टू पुणे, मे आय हेल्प यु? इ. साधी साधी वाक्य त्यांनी हमालांना शिकवली आणि विशेष म्हणजे हमालांनाही या बिनभिंतीच्या शाळेत शिकताना खूप मजा येत होती. याप्रसंगी सर्व हमालांनी इंग्रजी शिकण्याची व बोलण्याची शपथ घेतली.

मी जर इंग्रजी मधे पर्यटकांचे, स्वागत केले तर माझ्याकडे आणि माझ्या शहराकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होईल व मला चांगले उत्पन्नही मिळेल, माझ्या मुलांच्या अभ्यासाकडेही मला लक्ष देता

येईल व माझा न्यूनगंड जाऊन आत्मविश्वास निर्माण होईल. म्हणून अशा प्रकारचे उपक्रम राबविल्याबद्दल हमालांच्या वतीने श्री. अनंता डिंबळे या हमालाने डॉ. संजय चोरडिया यांचे आभार मानले.

प्रवाशांशी प्राथमिक इंग्रजी बोलल्यामुळे या हमालांना खूप फायदा होईल व त्यांची उर्जा सकारात्मक दिशेने जाईल असे प्रतिपादन स्टेशन मॅनेजर श्री. सुमित कामथने यांनी केले. श्री. रविंद्र माळवदकर यांनी शिक्षणाचे महत्व विषद करुन हमालांना उत्साहित केले व त्यांच्याच भाषेत भाषण करुन हमालांना नवी दिशा दाखवली.

सुर्यदत्ता इन्स्टिटयूट ने आयोजित केलेल्या या अनोख्या उपक्रमाला श्री. मोहन दुधाने, श्री. बी व्ही. पाटील यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुर्यदत्ता इन्स्टिटयूटचे कार्यकारी संचालक प्रा. एन.सी.सेठिया यांनी केले.

सर्व हमालंनी सुर्यदत्ता इन्स्टिटयूटच्या शिक्षकांना दिवाळीच्या इंग्रजी मध्ये शुभेच्छा दिल्या.

**अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. एन.सी.सेठिया – ८९५६९३२४०७**